पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०६

**सभावृत्तांत**

**दिनांक - १९/०१/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **१९/०१/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२.मा.साधना अंकुश मळेकर
३.मा.अनुराधा गणपत गोरखे
४.मा.सोनवणे शारदा हिरेन
५.मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६.मा.संगिता(नानी) प्रभाकर ताम्हाणे
७. मा. खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.आगळे – सहा.आयुक्त, मा.लिमण- उप नगरसचिव, मा.रामगुडे- कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.०८ दिनांक १२/०१/२०२१ रद्द करणेबाबत.- मा.शारदा सोनवणे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २) झोपडपट्टी क्षेत्रात रमाई आवास योजना ऐवजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड यांच्या मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविणेबाबत.-मा.अनुराधा गोरखे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०५/०१/२०२१ व १२/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचा(कार्यपत्रिका क्र.०५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १९/०१/२०२१
सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर
संदर्भ – मा.शारदा सोनवणे,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.०८ दिनांक १२/०१/२०२१ रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०२

दिनांक – १९/०१/२०२१

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ : मा.अनुराधा गोरखे,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

अनुसुचित जाती घटकातील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी महाराष्ट्र सरकार तर्फे ग्रामीण /शहरी भागातील अनुसूचित जातीच्या लोकांसाठी रमाई आवास/रमाई घरकुल योजना राबविली जाते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी क्षेत्रात राहणा-या नागरिकांचे राहणीमान उंचावणे व पक्की घरे मिळावी यासाठी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे ची स्थापना केली. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ ची तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड यांच्या वतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकलप राबविण्यात येतात. सदर पुनर्वसन प्रकल्पांतर्गत झोपडपट्टी मध्ये राहणा-या सर्व समाजाच्या पात्र लाभार्थ्यांना मोफत सदनिका दिली जाते. यास्तव पिंपरी चिंचवड महानरपालिका हद्दीतील झोपडपट्टी क्षेत्रामध्ये राहणा-या सर्व समाजातील घटकांना पक्के घर मिळावे यासाठी मनपा हद्दीत ज्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविणे शक्य आहे अशा झोपडपट्टी क्षेत्रात रमाई आवास योजना ऐवजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड यांच्यामार्फत राबविल्या जाणा-या पुनर्वसन प्रकल्पांचा लाभ देणेकामी मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३५/२०२१
दिनांक : २२/०१/२०२१



( **गोरखनाथ लिमण** )
प्र.कार्यालय अधिक्षक तथा
उप-नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.